## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५२ वा | गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूर महापालिका प्रशासन निवडणूक मतदानासाठी सज्ज



## 9 लाख 24 हजार 706 मतदार बजावणार हक्क

**सोलापूर (सचिन जाधव) :-** सोलापूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण व नियोजनबद्धरीत्या पार पाडण्यासाठी सर्वसमावेशक तयारी करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी शहरात एकूण 26 प्रभाग निश्चित करण्यात आले असून, 1091 मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

निवडणूक रिंगणात एकूण 564 उमेदवार असून, शहरातील एकूण 9 लाख 24 हजार 706 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली असून, कायदा व सुव्यवस्था दृष्टीने 46 मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त व विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

निवडणूक व्यवस्थापनाच्या दृष्टीने 7 निवडणूक निर्णय अधिकारी, 7 ठिकाणी ईव्हीएम मशीनचे वितरण, स्ट्राँग रूम तसेच मतमोजणी केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निप्रतिबंधक व्यवस्था व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. निवडणुकीसाठी एकूण 1365 कंट्रोल युनिट व 3494 बॅलेट युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

मतदान व मतमोजणी प्रक्रियेबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन टप्प्यांत प्रशिक्षण घेण्यात आले आहे. मतदारांमध्ये जनजागृती वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने बचत गट, शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मतदार शपथ कार्यक्रम, पथनाटय तसेच शहरातील प्रमुख ठिकाणी हॉडग्ज लावून व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे. निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी 7 खर्च तपासणी पथकांची नियुक्ती केली असून, उमेदवारांच्या खर्चावर काटेकोर नजर ठेवण्यात येत आहे.

### 2741 पोलिसांचा बंदोबस्त तैनात

कायदा व सुव्यवस्था व सुरक्षिततेसाठी एकूण 2741 पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, त्यामध्ये 151 पोलीस अधिकारी, 1680 पोलीस हवालदार, तसेच एसआरपीएफच्या 2 कंपन्यांचा समावेश आहे. महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या या सर्व नियोजनामुळे सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक ही शांततापूर्ण, निर्भय व यशस्वीरीत्या पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## मराठा, धनगर, लिंगायतसह बहुजन समाजातील नेत्यांना यंत्रणेच्या माध्यमातून भाजप अटकेची भिती घालत आहे - अमोल शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी असताना पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत थेट हस्तक्षेप करत आमदार देवेंद्र कोठे यांना हाताशी धरून मराठा, धनगर, लिंगायतसह बहुजन समाजातील नेत्यांना यंत्रणेकडून भाजपकडून अटकेची भीती घालून समाजाच्या नेतृत्वाला संपविण्याचे षडयंत्र रचत आहेत, असा गंभीर आरोप शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व पॅनल प्रमुख अमोल शिंदे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला.

पालकमंत्री गोरे हे रात्रीबेरात्री सोलापुरात फिरून प्रभाग क्रमांक ७ मधील मराठा समाजाचे नेतृत्व व उमेदवार अमोल शिंदे, प्रभाग क्रमांक ५ मधील दलित चळवळीचे नेते आनंद चंदनशिवे तसेच प्रभाग क्रमांक १५ मधील धनगर समाजाचे नेते चेतन नरोटे यांना राजकीयदृष्ट्या संपविण्याचा डाव आखत असल्याचा आरोप त्यांनी केला.



आ. देवेंद्र कोठे या निवडणुकीत मुख्य चेहरा... ! एक व्यक्ती म्हणजे समाज नाही.. ! निवडणूक हातातून गेल्याने हा केविलवाणा प्रयत्न... !

**- भाजपा नेते आमदार सचिन कल्याणशेट्टी**

आमदार देवेंद्र कोठे यांनी यापूर्वी राजाभाऊ खराडे, त्यानंतर अमोल शिंदे आणि आता पद्माकर काळे यांचा वापर करून मराठा समाजाचे नेतृत्व संपविण्याचा विडा उचलला असल्याचेही शिंदे यांनी स्पष्टपणे सांगितले. महापालिकेत पालकमंत्री व आमदार कोठे यांना केवळ 'जी हुजूर' करणारी माणसेच हवी असून लोकशाही मूल्यांची पायमल्ली सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. यापूर्वी नगरपालिकेच्या निवडणुकीत दडपशाहीच्या राजकारणामुळे भाजप अडचणीत आला होता. आता महानगरपालिकेतही तशीच परिस्थिती निर्माण झाली असून जिल्हा परिषदेतसुद्धा भाजपकडून षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप अमोल शिंदे यांनी केला. 'हा लोकशाहीविरोधी डाव सोलापूरकरांनी वेळीच हाणून पाडला पाहिजे,' असे आवाहनही त्यांनी केले.

जाणीवपूर्वक आपल्याला आणि आपल्या कार्यकर्त्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू असून यंत्रणेकडून अटकेची शक्यता नाकारता येत नसल्याची गंभीर भावना त्यांनी व्यक्त केली. मात्र अशा कोणत्याही दबावाला न घाबरता आपण लोकांच्या प्रश्नांसाठी आणि समाजाच्या नेतृत्वासाठी संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचे अमोल शिंदे यांनी ठामपणे सांगितले.

या पत्रकार परिषदेमुळे सोलापूरच्या राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली असून आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मतदानपूर्व तयारीची पाहणी; मुख्य निवडणूक निरीक्षक गुंडे व आयुक्त डॉ. ओम्बासेचा केंद्रांवर दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५झ२६ च्या पार्श्वभूमीवर उद्या होणाऱ्या मतदानाच्या अनुषंगाने आज मुख्य निवडणूक निरीक्षक मा. श्रीमती नयना गुंडे तसेच निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शहरातील विविध ठिकाणी भेट देऊन मतदानपूर्व तयारीची सविस्तर पाहणी केली.





या पाहणीदरम्यान एस. आर. फी कॅम्प, मेहता प्रशाला आणि शासकीय तंत्रनिकेतन या ठिकाणी उभारण्यात आलेल्या मतदान यंत्र (ईव्हीएम) वितरण केंद्रांना भेट देण्यात आली. यावेळी स्ट्राँगरूम, निवडणूक साहित्य वितरण प्रक्रिया तसेच सुरक्षाव्यवस्थेची तपासणी करण्यात आली. मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेण्यात आली.

उद्या होणाऱ्या मतदानासाठी आज शहरातील सर्व सात निवडणूक निर्णय अधिकारी (पान 2 वर..)

## अनुदान विचारले केली म्हणून अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याला बुटाने मारहाण

**वाशिम / सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** शेतमालाला हमीभाव नाही, कर्जमाफी नाही, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची योग्य भरपाई नाही, आणि आता आपल्या हक्काच्या अनुदानाबाबत विचारणा केली तर थेट बुटाने मारहाण अशी दयनीय अवस्था शेतकऱ्यांची राज्यातील सरकार व प्रशासनाने करून ठेवली असल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील गोगरी परिसरात मनरेगा योजनेअंतर्गत संत्रा फळबागेसाठी मंजूर अनुदान रखडल्याबाबत एका शेतकऱ्याने तालुका कृषी अधिकाऱ्याकडे विचारणा केली. मात्र या साध्या प्रश्नालाच अधिकाऱ्याने आक्रमक प्रतिसाद देत शेतकऱ्याला बुटाने आणि मातीच्या ढेकळाने मारहाण



केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

'शासनाच्या योजनांबाबत विचारणाही शेतकऱ्यांनी करायची नाही का?' असा सवाल उपस्थित होत असून, ही घटना म्हणजे कृषी प्रशासनाची मुजोरी आणि शेतकऱ्यांविषयी असलेली घृणास्पद मानसिकता उघड करणारी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

या प्रकरणावर राजकीय वतुर्ळातूनही तीव्र शब्दांत टीका करण्यात येत आहे. 'फडणवीस सरकार शेतकरीविरोधी आहे, हे वारंवार सिद्ध होत आहे. एकीकडे सरकारमधील लोक शेतकऱ्यांसाठी अपमानास्पद भाषा वापरतात, तर दुसरीकडे मुजोर सरकारी अधिकारी थेट शेतकऱ्यांवर बुटाने हल्ला करतात. ही भाषा आणि ही कृती दोन्ही शेतकऱ्यांचा घोर अपमान करणारी आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली आहे.

या घटनेनंतर संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यावर तात्काळ निलंबनासह कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षांकडून केली जात आहे. 'शेतकऱ्यांवर अन्याय करून दादागिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना जर शासन संरक्षण देत असेल, तर तो शेतकऱ्यांवरील अन्यायच ठरेल,' असा इशाराही देण्यात येत आहे.

या प्रकरणावर शासन व कृषी विभाग काय भूमिका घेतो, दोषींवर कारवाई होते की नाही, याकडे राज्यातील शेतकरी वगार्चे लक्ष लागले असून, या घटनेमुळे कृषी प्रशासनाची विश्वासार्हता पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे.

## ३५०० पोलिसांचा ४८ तास खडा पहारा

### क्युआरटी, आरसीपी, एसआरपीएफच्याही तुकड्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेसाठी गुरुवारी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी सोलापूर शहरातील एक हजार ९१ बूथवर मतदान पेट्या वितरित करण्यात आल्या आहेत.



त्यासोबत पोलिसांचा बंदोबस्तही प्रत्येक बूथवर दाखल झाला. निवडणुकीसाठी सोलापूर शहर व बाहेरील अधिकारी, अंमलदार असा एकूण साडेतीन हजार पोलिसांचा बंदोबस्त नेमला आहे. ४८ तासांचा हा बंदोबस्त मतदान पेट्या गोदामात जमा झाल्यावर संपणार आहे.

सोलापूर महापालिकेसाठी बाहेरील जिल्ह्यातून एक पोलिस उपायुक्त, चार सहायक पोलिस आयुक्त, दोन पोलिस निरीक्षक, ६० सहायक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि ४७५ अंमलदार आले आहेत. हा बंदोबस्त सोलापूर शहरातील १८०० अंमलदारांसमवेत असणार आहे. (पान 2 वर..)

## महानगरपालिका निवडणुकांच्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील 29 महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी गुरुवारी मतदान होत असून त्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. 2 हजार 869 जागांसाठी ही निवडणूक होत असून 3 कोटी 48 लाख 79 हजार 337 मतदारांकरिता 39 हजार 92 मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक रिंगणात 15 हजार 908 उमेदवार आहेत; तसेच पुरेशा पोलीस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.



### मतदान नक्की करा

'महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या शहराच्या- महानगराच्या जडणघडणीत योगदान द्यावे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रीय सहभाग नोंदवावा. आपलं मत आपल्या शहराचं भवितव्य ठरवू शकतं. कारण ते अनमोल आहे. लोकशाहीतला तो आपला महत्वाचा हक्क आहे आणि तो आपण मतदानाच्या माध्यमातून बजवायला हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मतदारांना आवाहर केले आहे.'

**दिनेश वाघमारे,** राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोगाने 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा 15 डिसेंबर 2025 रोजी केली होती. त्यानुसार बृहन्मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, वसई- विरार, कोल्हापूर, कल्याण- डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, नाशिक, पुणे, पिंपरी- चिंचवड, सोलापूर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, लातूर, परभणी, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल, मीरा- भाईंदर, नांदेड- वाघाळा, सांगली- मीरज, कुपवाड, जळगाव, धुळे, अहिल्यानगर, इचलकरंजी आणि जालना महानगरपालिकेसाठी मतदान होत आहे.

मतदान सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होईल. मतमोजणीस संबंधीत ठिकाणी 16 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता सुरवात होईल. मतदारांमध्ये 1 कोटी 81 लाख 94 हजार 292 पुरुष, 1 कोटी 66 लाख 80 हजार 449 महिला; तर 4 हजार 596 इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठीच्या एकूण 39 हजार 92 मतदान केंद्रांपैकी एकूण 3 हजार 196 संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली आहेत.

### राजकीय पक्षांची बैठक

महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीची तयारी; तसेच 12 जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गच्या 125 पंचायत समितींच्या निवडणुकांची तयारी याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलीस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदान, मतमोजणी; तसेच कायदा व सुव्यवस्था याबाबत उपस्थित प्रतिनिधींना अवगत करण्यात आले.

### इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची व्यवस्था

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 43 हजार 958 कंट्रोल युनिट आणि 87 हजार 916 बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी 11 हजार 349 कंट्रोल युनिट आणि 22 हजार 698 बॅलेट युनिटची व्यवस्था केली आहे.

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व 28 महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व 28 महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणतः चार जागा असतील. काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असू शकतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने साधारणतः 4 मते देणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी 3 ते 5 मते देणे अपेक्षित असेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 227 प्रभाग असून यासह सर्व महानगरपालिका मिळून 893 प्रभाग आहेत. त्यात 2 हजार 869 जागांचा समावेश आहे. त्यासाठी 15 हजार 908 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. (पान 2 वर..)






संपादकीय

# मत विकू नका!

महाराष्ट्रातील महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सध्या जे वातावरण तयार झाला आहे, ते लोकशाहीसाठी अत्यंत चिंताजनक आहे. निवडणूक म्हणजे लोकशाहीचा उत्सव असायला हवा; पण आज तो पैसे, दारू, जेवणावळी, सहली, धमक्या आणि गुंडगिरीचा बाजार बनत चालला आहे. 'लक्ष्मी दर्शन', रोख रक्कम, दारूच्या बाटल्या, ढाबा पार्टी, हॉटेल बुकिंग आणि नेत्यांच्या उघड धमक्या यामुळे निवडणुकीची हवा अक्षरशः दूषित झाली आहे. याहूनही गंभीर बाब म्हणजे काही तथाकथित मोठे नेते जाहीर सभांमध्ये निर्लज्जपणे सांगतात, 'त्यांचे पैसे घ्या आणि आम्हालाच मत द्या.' ही केवळ बेशरम विधाने नाहीत, तर लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारी मानसिकता आहे. अशा वेळी लोकशाही वाचवण्याची संपूर्ण जबाबदारी थेट मतदारांवरच येऊन पडते.

पैसा घेऊन दिलेले मत म्हणजे व्यवहार असतो; तर निःस्वार्थपणे दिलेले मत म्हणजे लोकशाहीची सेवा. पाच–दहा हजार रुपये घेऊन मत विकणे हा क्षणिक फायदा वाटतो; पण प्रत्यक्षात तो पाच वर्षांच्या यातनांचा करार असतो. फुटलेली गटारे, अनियमित पाणीपुरवठा, कचऱ्याचे ढीग, बंद पडलेले दवाखाने, औषधांचा अभाव, गल्लीबोळातील अराजक — हे सगळे त्या 'विकलेल्या मता'चे परिणाम असतात.

मत विकून निवडून आलेला नगरसेवक किंवा लोकप्रतिनिधी नंतर मतदाराच्या दारात उभासुद्धा राहत नाही. उलट तो निर्ढावलेपणाने विचारतो, 'मी तुम्हाला फुकट दिलं होतं का?' तेव्हा मतदाराच्या लक्षात येते की पाच हजार रुपयांत विकलेले मत म्हणजे पाच वर्षांच्या अपमानाचे, त्रासाचे आणि उपेक्षेचे तिकीट होते.

या पैशांच्या राजकारणाचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे खऱ्या सेवाभावी, प्रामाणिक आणि समाजासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांचे राजकारणातून हद्दपार होणे. आज निवडणूक म्हणजे 'ज्याच्याकडे पैसा त्याच्याकडे सत्ता' हे विकृत समीकरण बनले आहे. जेवणावळी, सहली, देवदर्शन, भेटवस्तू याच्या जोरावर निवडणुका जिंकल्या जात आहेत; आणि लोकांसाठी रात्रंदिवस काम करणारे कार्यकर्ते हरत आहेत. कारण आज मेहनत नाही, तर पैसा जिंकतो. दरवेळी असेच होत राहिले तर नगरसेवक, आमदार, खासदार सगळेच पैशाच्या पुरात वाहून जातील. लोकशाही कायदे बनवणाऱ्यांच्या हातात न राहता माफिया, दलाल, गुंड, दारूवाले, वाळू माफिया, बिल्डर आणि काळाबाजार करणाऱ्यांच्या ताब्यात जाईल. निवडणुकीत दिले जाणारे पाच–दहा हजार रुपये ही मदत नसते; ती एक साखळी असते. त्या साखळीच्या दुसऱ्या टोकाला गुन्हेगारी, भ्रष्टाचार आणि समाजाचा ऱ्हास उभा असतो.

मतदारराजा जागा झाला तरच ही साखळी तुटू शकते. एक मत एका गल्लीचे भविष्य बदलू शकते, एक शहर वाचवू शकते, एक पिढी घडवू शकते. आणि तेच मत पैशात विकले गेले तर एक पिढी रसातळाला नेण्याची ताकदही त्यात असते.

लोकशाही वाचवायची असेल, तर मतदारांनी ठाम भूमिका घ्यावी लागेल. पैशाचे आमिष नाकारले पाहिजे. दारू, भेटवस्तू, ढाबा पार्टी, सहली यांना स्पष्ट नकार दिला पाहिजे. जो उमेदवार पैसे देतो, तोच सर्वात अयोग्य आहे, ही जाणीव मनात पक्की झाली पाहिजे. परिश्रमी, उपलब्ध, सेवाभावी आणि स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवारालाच मत दिले पाहिजे. भीती, दहशत, दबाव यांना थारा दिला तर लोकशाहीच संपेल. लोकशाहीचे खरे रक्षण मतदान केंद्रावर होते. 'तुमची निवड विकत घेता येत नाही' हे उमेदवारांना दाखवून देणे हाच निवडणुकीतला खरा विजय आहे. गुंड, माफिया, दलाल आणि काळ्या पैशांचे वर्चस्व मोडायचे असेल, तर त्यांना मतदानातून वठणीवर आणण्याची ताकद केवळ मतदारांकडेच आहे. मतदारराजा, पाच हजारांच्या आमिषात पाच वर्षांचे भविष्य विकू नका. तुमचे मत अमूल्य आहे. त्याला किंमत लावू नका. मतदारराजा जागा हो!

पान १ वरून

## महानगरपालिका निवडणुकांच्या...

**पोलीस बंदोबस्त**

महानगरपालिका निवडणुकांसाठी पुरेशा पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 3 अपर पोलीस अधीक्षक, 63 पोलीस उप अधीक्षक, 56 पोलीस निरीक्षक, 858 सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक आणि 11 हजार 938 पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याचबरोबर 42 हजार 703 होमगार्ड देखील तैनात करण्यात आले आहेत. मतमोजणी आणि कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाच्या एकूण 57 कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत.

## मतदानपूर्व तयारीची पाहणी...

स्तरावरील ठिकाणी मतदान यंत्रांसह आवश्यक निवडणूक साहित्याचे वितरण करण्यात आले आहे. मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या मतदान केंद्रांवर वेळेत पोहोचता यावे, यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने बसची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून कायदा व सुव्यवस्था, सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन तसेच मतदारांसाठी आवश्यक मूलभूत सुविधांची योग्य ती आखणी करण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, अशा सूचना मुख्य निवडणूक निरीक्षक व आयुक्तांनी दिल्या. दरम्यान, सोलापूर शहरातील मतदारांनी कोणत्याही भीतीशिवाय, निर्भयपणे व उत्साहाने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. लोकशाहीचा उत्सव असलेल्या या निवडणुकीत मोठ्या संख्येने मतदान होईल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## ३५०० पोलिसांचा ४८ तास...

मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, यासाठी शिघ्र प्रतिसाद दलाच्या पाच तुकड्या, दंगा नियंत्रण सहा पथके, राज्य राखीव पोलिस बलाच्या दोन तुकड्या देखील बंदोबस्तात असतील. प्रत्येक पोलिस ठाण्याअंतर्गत दोन बीट मार्शल, सेक्टर पेट्रोलिंगच्या ३५ गाड्या शहरात गस्त घालणार आहेत. प्रत्येक बूथ आणि तेथील १०० मीटर परिसरात देखील पोलिस असणार आहेत. शहरातील संपूर्ण बंदोबस्तावर पोलिस आयुक्त एम. राज कुमार, उपायुक्त विजय कबाडे, डॉ. अश्विनी पाटील, गौहर हसन यांचे विशेष लक्ष असणार आहे. वरिष्ठ अधिकारी देखील शहरातील विविध मतदान केंद्रांना भेटी देऊन तेथील परिस्थितीचा अंदाज घेणार आहेत.

**मतदान पेट्या जमा केल्यावर संपेल बंदोबस्त**

महापालिकेसाठी उद्या (गुरुवारी) मतदान होणार आहे. सायंकाळी साडेपाच वाजता मतदान पार पडल्यावर प्रत्येक मतदान केंद्रावरील पेट्या रामवाडी गोदामात जमा केल्या जातील. त्यानंतर बुधवारी (ता. १४) नेमलेला बंदोबस्त संपणार आहे. गुन्हे शाखा, विशेष शाखा, राज्य गुप्तवार्ता व स्थानिक पोलिसांची पथकांसह साध्या वेशातील पोलिस देखील शहरात फिरणार आहेत. निकालाच्या दिवशी शुक्रवारी (ता. १६) देखील शहरात असाच तगडा बंदोबस्त असणार आहे.

# रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती अधिक चांगली...

आजकाल रक्ताची नाती रक्ताच्या नात्याला कामी येताना दिसत नाही. परंतु जोडलेली नाती रक्ताच्या नात्यापेक्षा अधिक चांगली असते. रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती माणसाच्या मदतीला पटकन धावून येते. सुखदुःखात व वाईट काळात खंबीरपणे साथ देते. आर्थिक संकटात व मुलाबाळांच्या शिक्षणाला आर्थिक मदत करून त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करते. परंतु हल्ली कुठेही जा प्रत्येक घरातील रक्ताच्या नात्यात कोणत्या ना कोणत्या कारणाने धुसफुस व कलह सुरू आहेत. एकेकाळी रक्ताच्या नात्यांमध्ये असणारा जिव्हाळा, आपुलकी, माया व प्रेम कमी झाले आहे. आता रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नाती चांगली म्हणायची वेळ आली आहे. रक्ताच्या नात्यांमध्ये सख्खे भाऊ एकमेकांबद्दल खुन्नस धरून एकमेकांचे तोंड बघायला तयार नाहीत. त्यांच्यामध्ये शेतीच्या वाटणीवरून, घराच्या वाटणीवरून किंवा गरिबी श्रीमंती वरून दररोज भांडण तंटे चालू असतात. भावकीतील एखादा मुलगा मोठ्या पदावर अधिकारी म्हणून रुजू झाला तर भावकीतील सदस्यांना आनंद व्हायला पाहिजे परंतु त्याचे ते यश पाहून भावकीतील सदस्यांना जराही आनंद न होता त्यांच्या बुडाला मिरच्या झोंबत असतात. ते नाहक अंगाचा जळफळाट करून घेतात. कारण भावकीतील सदस्यांना वाटत असते की, हा मुलगा माज्या मुलापेक्षा खूप श्रीमंत होईल, त्याच्याकडे आलिशान गाडी व अलिशान बंगला राहील आणि तो सुखी व समाधानी जीवन जगेल, समाजात व गावात त्याला मानपान मिळेल. लोक आम्हाला नावे ठेवतील, समाजात आम्हाला त्यांच्या एवढी किंमत मिळणार नाही, म्हणून अशी जळकी माणसे असा निगेटिव्ह विचार करून अंगाचा नाहक तिळपापड करून घेतात. आजकाल एखादा मुलगा मोठ्या पोस्टवर क्लास वन अधिकारी म्हणून विराजमान झाला तर भावकीतील सदस्याला आनंद होण्याऐवजी दुःख होत आहे. पण गावकऱ्यांना व समाज बांधवांना याचा खूप मोठा आनंद व अभिमान वाटत असतो. एखाद्याने शेतात खूप खूप काबाडकष्ट करून व अहोरात्र मेहनत करून शेती चांगली पिकवली आणि सुगी चांगली काढली. की, भावकीच्या लोकांना आनंद होण्याऐवजी दुःख होते. त्यांना भावाची बरकत पाहून खूप खूप दुःख होते. जेवढे भावाचे वाटोळे होईल तेवढे दुसऱ्या भावाला चांगले वाटते. परंतु गावकऱ्यांना व समाज बांधवांना आपल्या गावातील एखादा मुलगा चांगली शेती करत असेल आणि भरभरून सुगी काढत असेल तर याचा आनंद गावकऱ्यांना होतो परंतु सख्ख्या भावाच्या व भावकीतील लोकांच्या अंगाचा जळफळाट होतो. आजकालच्या लोकांना वाटत असते की, मोठा अधिकारी झाला तर तो दुसऱ्याचा व्हावा परंतु आपल्या घरातील भावकीचा मुलगा मोठ्या पदावर विराजमान होऊ नये, म्हणून ते देवाला साकडे घालतात. आजकाल गरीब शेतकऱ्याच्या मुलीच्या लग्नाला पैशाची चणचण भासत असेल, मुलीच्या बापाला पैशाची अत्यंत गरज भासत असेल तर त्याच घरातील सदस्य आपल्याच घरातील मुलीला हुंड्यासाठी आर्थिक मदत करायला पुढाकार घेताना दिसत नाहीत. पैशाचा हातभार परके लोक लावतात परंतु भावकीतील लोक भावाच्या मुलीच्या लग्नाला आर्थिक मदत करताना काचकूच करतात. म्हणजे आजकालचे लोक भावकीतील सदस्याला धंद्यात, व्यवसायात, परीक्षेत आणि शेतीत खूप खूप काबाडकष्ट करून यश प्राप्त झाले तर भावकीतील लोकांना आपल्याच घरातील सदस्याचे चांगले झालेले पहावत नाही. भावकीला जेवढे घरातील सदस्याचे वाटोळे होईल किंवा त्यांना अपयश येईल तेवढा अधिक आनंद त्यांना होतो. परंतु समाजातील व गावातील मुलांना स्पर्धा परीक्षेत चांगले यश प्राप्त झाले तर भावकीला आनंद न होता गावकिला आनंद अधिक होतो. गावातील सदस्याने एखादे आलिशान हॉटेल टाकले तर भावकीला खूप खूप दुःख होते परंतु गावकिला याचा खूप आनंद होतो. आणि भावकीच्या अंगाचा तिळपापड होतो आणि लगेच भावकीतील सदस्य त्याच्याच बाजूला तसेच दुसरे हॉटेल टाकते. भावकीतील एखादा सदस्य क्लास वन अधिकारी झाला किंवा एखाद्या क्षेत्रातील मोठा उच्च पदस्थ अधिकारी झाला तर भावकीतील लोकांच्या बुडाला मिरच्या झोंबतात. आणि ते सुद्धा आपल्या मुलांना असाच अधिकारी होण्याचा सल्ला देतात. परंतु काहीतरी आगळे वेगळे करण्यासाठी त्यांना प्रेरित करत नाहीत. भावाचा मुलगा एखाद्या क्षेत्रातील मोठा अधिकारी झाला की, त्या मुलाच्या चुलत्याला आपलाही मुलगा असाच मोठा अधिकारी व्हावा असे वाटत असते. चुलत्याला पुतण्याचे यश पाहवत नाही. भावाच्या मुलाला एखाद्या परीक्षेत आपल्या मुलापेक्षा सर्वाधिक गुण मिळाले तर त्या मुलाचा चुलता ढसाढसा रडताना मी पाहिला आहे. आजकाल स्पर्धा एकाच घरात रक्ताच्या नात्यांमध्ये लागली आहे. लोक बाहेरच्या सोबत स्पर्धा न करता घरातील सदस्या बरोबर स्पर्धा करून दुःखाला सामोरे जात आहेत. सख्खा भाऊ आजारी पडल्यावर त्याला बघायला त्याची सख्खी बहीण एक वेळ यायची नाही, परंतु त्याने जोडलेली बहीण मात्र हमखास आपल्या जोडलेल्या भावाला बघायला येते. आजकाल रक्ताच्या नात्यांमध्ये प्रचंड स्वार्थ वाढला आहे. म्हणून रक्ताची नाती तटातट तुटून लांब जात आहे. जोडलेल्या नात्यात कसलाच स्वार्थ नसतो, जोडलेले नाते हे पवित्र नाते असते. म्हणून रक्ताच्या नात्यापेक्षा जोडलेली नातेच कधीही चांगले असते. रक्षाबंधन व दिवाळी सणाला आपण बघत असतो की, सख्या बहिणी सख्ख्या भावाला राखी बांधायला येत नाहीत. परंतु मानलेल्या बहिणी मात्र आपल्या भावाला राखी बांधण्यासाठी आवर्जून येतात. आजकाल रक्ताची नाती टिकत नसल्यामुळे बहुतांश लोक परकी नाती जोडत आहेत. आणि जीवनभर त्या नात्याला जपत आहेत. रक्ताच्या नात्यांमध्ये प्रचंड स्वार्थ वाढल्यामुळे परक्या नात्याला जवळ करून त्यांच्याशी आपुलकीचे नाते जोडावे लागत आहेत. त्यासाठी माणसाने नात्यातील स्वार्थ बाजूला सारून एकमेकांना जीव लावावा... शेवटी परक्या नात्यापेक्षा रक्ताची नातीच तुम्हाला अधिक कामाला येतील.. जर एकमेकांसोबत प्रेमाने, आपुलकीने, जिव्हाळ्याने व एक मताने विश्वास ठेवून एकमेकांना मदत करत नाते जपले तर ते नाते आपल्या संकट कळात व वाईट काळात

आवर्जून आपल्या कामाला येतील, त्यासाठी रक्ताची नाती तोडण्यापेक्षा त्यांना मनापासून निभावण्याची तयारी ठेवा.. आपोआप नात्याची गुंफण अधिक घट्ट होईल....

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

# श्री गुरु तेग बहादुर साहिब जी : मानवतेचे रक्षक

मानवतेच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी संपूर्ण समाजाचे मार्गदर्शक ठरतात. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या जीवनातून सहिष्णुता, मानवतेचे रक्षण आणि सत्यासाठी बलिदान यांचे सर्वोच्च उदाहरण घालून दिले. त्यांच्या शहादतीला 350 वर्षे पूर्ण होत असताना, नांदेड येथे 24 व 25 जानेवारी 2026 रोजी आयोजित शहीदी समागम हा केवळ स्मरणोत्सव नसून मानवतेच्या मूल्यांचा पुनःप्रत्यय देणारा एक ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

**जीवनदर्शन–**

श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा जन्म 1621 मध्ये अमृतसर येथे झाला. गुरु हरगोबिंद साहिब जी यांचे ते सुपुत्र होते. बालपणापासूनच त्यांच्यातील आध्यात्मिकता, शौर्य आणि करुणा प्रकषार्ने दिसून येत होती. तलवारबाजीतील प्रावीण्यामुळे त्यांना "तेग बहादुर" हे नाव मिळाले. परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा खरा गाभा होता झ्र मानवतेसाठीची निष्ठा आणि स्वातंत्र्याचे रक्षण.

**मानवतावादी कार्य–**

गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी आपल्या प्रवासात



समाजातील दुर्बल, पीडित आणि शोषित घटकांना आधार दिला. त्यांनी लोकांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली.

**स्वातंत्र्याचे रक्षण :**

समाजातील लोकांना त्यांच्या श्रद्धा आणि परंपरेनुसार जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला.

**समानतेचा संदेश :**

त्यांनी समाजातील जातिभेद, अन्याय आणि विषमता यांना विरोध केला. त्यांच्या शिकवणीत प्रत्येक मानव समान आहे, ही भावना प्रकट होते.

**आध्यात्मिक मार्गदर्शन :**

गुरुजींनी लोकांना लोभ, मोह, अहंकार यापासून दूर राहून सत्य, करुणा आणि सेवा यांचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले.

**त्याग आणि बलिदान :**

स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणे ही त्यांच्या मानवतावादी कायार्ची सर्वोच्च अभिव्यक्ती होती.

**शहादतीचे महत्त्व–**

1675 मध्ये दिल्लीच्या चांदणी चौकात गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी शिर देऊन मानवतेचे रक्षण केले. "शिर दिले, पण शिर न झुकविले" ही त्यांची शहादत आजही इतिहासातील अद्वितीय घटना मानली जाते. त्यांनी दाखवून दिले की प्रत्येक व्यक्तीला आपला मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य मिळावे, हीच खरी मानवता आहे.

**नांदेडचा समागम : 350 वर्षांची प्रेरणा**

नांदेड हे शीख परंपरेतील पवित्र स्थळ असून गुरु गोविंदसिंह जी यांचे अंतिम निवासस्थान आहे. अशा या पवित्र भूमीत 24 व 25 जानेवारी 2026 रोजी होणारा 350 वा शहीदी समागम हा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचा ठरणार आहे.

या कार्यक्रमात प्रवचन, कीर्तन, ग्रंथपठण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मानवतेच्या संदेशावर आधारित परिसंवाद आयोजित केले जातील.

विविध क्षेत्रातील प्रतिनिधी, विद्वान आणि समाजसेवक एकत्र येऊन गुरुजींच्या शिकवणीचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करतील.

युवकांना मानवतेच्या मूल्यांची जाणीव करून देण्यासाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबवले जातील.

**आधुनिक काळातील संदर्भ–**

आजच्या जगात सामाजिक विषमता आणि हिंसा वाढताना दिसते. अशा परिस्थितीत गुरु तेग बहादुर साहिब जी यांचे जीवन आणि शहादत आपल्याला सांगते की –

- – समाज म्हणजे प्रेम, करुणा आणि सहिष्णुता.
- – दुर्बल घटकांचे रक्षण करणे ही खरी सेवा आहे.
- – सत्यासाठी उभे राहणे, कितीही कठीण असले तरी, हेच मानवतेचे सर्वोच्च कर्तव्य आहे.

गुरु तेग बहादुर साहिब जी यांचे मानवतावादी कार्य हे केवळ इतिहासाचा भाग नाही, तर आजच्या समाजासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. नांदेड येथील 350 वा शहीदी समागम हा त्यांच्या शिकवणीचा पुनःप्रत्यय देणारा प्रसंग आहे. या समागमातून आपण सर्वांनी मानवतेचे मूल्य, सहिष्णुता आणि सत्यासाठी बलिदान यांचा संदेश आत्मसात करावा, हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

जिल्हा माहिती कार्यालय,
सोलापूर

# पटणेंच्या जाण्यांने ग्रंथालय चळवळीतील ज्येष्ठ नेतृत्व हरपले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** ग्रंथालय चळवळीतील ज्येष्ठ नेते, मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, तसेच सध्या नांदेड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष असलेले माजी आमदार गंगाधरजी पटणे यांच्या निधनाने ग्रंथालय चळवळीला मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सोलापूर येथील साहित्य निकेतन ग्रंथालयात सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ व हुतात्मा वाचनालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

गंगाधरजी पटणे यांच्या निधनाची दुःखद वार्ता समजताच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली. त्यांच्या आजन्म योगदानाचा यावेळी उपस्थितांनी गौरव केला. ग्रंथालय चळवळीशी ते इतके एकरूप झाले होते की मंत्रालयात गेले असता इतर आमदार, मंत्री व अधिकारी त्यांचा उल्लेख आवर्जून 'आले ग्रंथालयाचे आमदार' असा करत असत, अशी आठवण ग्रंथालय चळवळीतील ज्येष्ठ नेते कुंडलिक मोरे यांनी आपल्या मनोगतातून करून दिली.

मोरे पुढे म्हणाले की, 'गंगाधरजी पटणे यांचे जाणे ही केवळ कुटुंबाचीच नव्हे तर संपूर्ण ग्रंथालय चळवळीची मोठी हानी आहे. त्यांनी दिलेले नेतृत्व, मार्गदर्शन आणि त्याग कार्यकर्त्यांना सदैव प्रेरणादायी ठरेल. ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते त्यांचे योगदान कधीही विसरणार नाहीत.'

त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाची निवड अनेकदा बिनविरोध होत गेली. सर्वांना सोबत घेऊन, अचूक मार्गदर्शन करत त्यांनी ग्रंथालय चळवळीची वाटचाल पुढे नेली, असे वक्त्यांनी सांगितले.

या श्रद्धांजली सभेला जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे, वृषाली हजारे, कोषाध्यक्ष सारीक माढेकर व गितांजली गंभीर आदींसह वाचनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# देशाची उभारणी की अपयशांची मालिका?

## इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांतील घोटाळे, नियोजनशून्यता आणि निकृष्ट कामांवर तीव्र टीका

**मुंबई/सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** देशभरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, ह्लनवीन भारतह्व प्रत्यक्षात नियोजनशून्य, घाईघाईत आणि निकृष्ट कामांचा नमुना ठरत असल्याची तीव्र टीका विविध स्तरांतून होत आहे. मेट्रो, पूल, फ्लायओव्हर, रस्ते, बोगदे, विमानतळ, रेल्वे स्थानके अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांवर हजारो कोटी रुपये खर्च होत असले, तरी त्यांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि उपयुक्तता यावर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मध्य प्रदेश आणि दिल्लीतील मेट्रो प्रकल्पांमध्ये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर खालून जाणाऱ्या वाहनांसाठी पुरेशी उंचीच नसल्याचे लक्षात आल्याने, पुन्हा खाली खोदकाम करून उंची वाढवावी लागत आहे. यामुळे पावसाळ्यात पाणी साचण्याचा धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नियोजनातील अशा गंभीर चुकांमुळे सार्वजनिक पैशांचा अपव्यय होत असल्याचा आरोप केला जात आहे.

मध्य प्रदेशातील भोपाळ येथे सरकारी निधीतून नगरभवन उभारण्यात आले. मात्र इमारत पूर्ण झाल्यानंतर लक्षात आले की प्रत्यक्ष सभागृहच बांधले गेलेले नाही. परिणामी बाजूच्या जमिनीवर नव्याने सभागृह उभारण्यासाठी पुन्हा टेंडर काढावे लागले. त्याच राज्यात केवळ १५ खांब उभारण्यासाठी सिमेंटच्या पोत्याची किंमत दोन लाख रुपये दाखवण्यात आल्याचे, तसेच प्लम्बिंगच्या कामाचे बिल काही लाखांपर्यंत गेल्याचे आरोप होत आहेत.

गुजरातमध्ये उभारण्यात आलेला एक चकाचक पूल सोशल मीडियावर रील्ससाठी प्रसिद्ध झाला असला, तरी प्रत्यक्ष वाहतुकीसाठी तो निरुपयोगी ठरला आहे. कारण पूल जिथे संपतो, तिथून पुढे रस्ताच नसून ती खाजगी जमीन असल्याचे समोर आले आहे. भोपाळमधील एक फ्लायओव्हर तब्बल ९० अंश कोनात वळत असल्याने तो वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असल्याची टीका होत आहे.

मुंबईतील गोखले पूल अद्याप कुठेच पोहोचत नसल्याचा आरोप होत असून, हजारो कोटी रुपये खर्चून बांधलेल्या अटल सेतूवर पुन्हा एक अतिरिक्त लेयर टाकण्याची वेळ येणे ही गंभीर बाब असल्याचे मानले जात आहे. देशभरात अनेक ठिकाणी रस्ते, पूल, बोगदे, मेट्रो मार्ग, स्टेडियम आणि इमारती गळत असल्याचे, तुटत असल्याचे किंवा कोसळत असल्याचे प्रकार समोर आले असून, त्यात नागरिकांचे प्राणही जात आहेत.

या पार्श्वभूमीवर 'हजारो कोटींची टेंडर प्रक्रिया मात्र सातत्याने सुरू आहे, पण कामांची गुणवत्ता आणि जबाबदारी कुणाची?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. समृद्धी महामार्ग आणि प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग हे अडाणी समूहाला विदर्भातील खाणीमधील कोळसा थेट बंदरांपर्यंत पोहोचवण्यासाठीच असल्याचा आरोपही केला जात आहे.

या सर्व घडामोडींमुळे 'हा असा नवीन भारत उभारला जात आहे का?' असा प्रश्न उपस्थित होत असून, स्थानिक स्वराज्य संस्थांची या प्रकल्पांमधील भूमिका, जबाबदारी आणि सहभाग यावरही गंभीर चर्चा सुरू झाली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'अशाच हातात पुन्हा सत्तेच्या चाव्या द्यायच्या का?' हा सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत.

# 'वंदे भारत'मध्ये गुजरातीला मान

## मायमराठी ४ क्रमांकावर प्रवाशांत तीव्र संताप

**मुंबई/ सोलापूर (कटूसत्य वृत्त) :–** एकीकडे मराठी अस्मिता आणि मराठी माणूस एकवटत असतानाच, दुसरीकडे मराठी भाषेच्या अस्तित्वावरच घाला घालण्याचा प्रकार रेल्वेकडून सुरू असल्याचा आरोप होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी 'वंदे भारत' सुपरफास्ट एक्स्प्रेसमध्ये त्रिभाषा सूत्र धाब्यावर बसवून गुजराती भाषेला प्राधान्य देण्यात येत असून, महाराष्ट्राची राज्यभाषा मराठीला थेट चौथ्या क्रमांकावर ढकलण्यात आल्याने मुंबईकर प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते राम नाईक हे रेल्वे राज्यमंत्री असताना महाराष्ट्रात राज्यभाषा मराठी, त्यानंतर हिंदी आणि इंग्रजी असे त्रिभाषा सूत्र निश्चित करण्यात आले होते. मात्र ह्यवंदे भारतह्ण या पंचतारांकित, अत्याधुनिक आणि सुपरफास्ट एक्स्प्रेसमध्ये या धोरणालाच हरताळ फासण्यात आल्याचे चित्र समोर आले आहे.

अहमदाबादहून मुंबई सेंट्रलला येणाऱ्या 'वंदे भारत' एक्स्प्रेसमध्ये करण्यात येणाऱ्या उद्घोषणांमध्ये सर्वप्रथम हिंदी, त्यानंतर इंग्रजी, मग गुजराती आणि शेवटी मराठी अशी क्रमवारी ठेवण्यात आली आहे.



ही बाब केवळ भाषिक क्रमवारीचा मुद्दा नसून, महाराष्ट्राच्या राज्यभाषेचा अवमान असल्याची तीव्र भावना प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे. 'मुंबई महाराष्ट्रात आहे. अशा परिस्थितीत मराठी उद्घोषणा सर्वप्रथम होणे अपेक्षित आहे. पण मुद्दाम मराठीला दुय्यम, किंबहुना चौथ्या क्रमांकावर टाकले जात आहे. हा मराठी माणसाच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया मुंबईकर प्रवाशांनी दिली.

या प्रकारामुळे 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव सुरू आहे का?' असा गंभीर सवालही उपस्थित केला जात आहे. मुंबईबाबत सुरू असलेल्या विविध वादांच्या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाची ही भूमिका संशयास्पद असून, मराठी भाषेचे महत्व कमी करण्याचा हा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न असल्याचा आरोप होत आहे.

या संपूर्ण प्रकरणावर रेल्वे प्रशासनाने तात्काळ खुलासा करावा, तसेच 'वंदे भारत'सह सर्व रेल्वे सेवांमध्ये महाराष्ट्रात मराठी भाषेला प्रथम प्राधान्य द्यावे, अशी मागणी प्रवासी संघटना, भाषिक अभ्यासक आणि मराठीप्रेमी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात येत आहे.

मराठी अस्मितेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, 'वंदे भारत'मधील भाषा प्राधान्यक्रमावरून राज्यात नवा वाद पेटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# डिजिटल न्यायक्रांतीकडे सोलापूरची वाटचाल, ई-कोर्ट प्रशिक्षण शिबिर यशस्वी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** e-Committee, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या वतीने ECT122025 या विशेष ई-कोर्ट प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील सात रस्ता, सोलापूर येथे करण्यात आले. सकाळी 9.30 वाजता उत्साहपूर्ण वातावरणात या प्रशिक्षणाला सुरुवात झाली.

या प्रशिक्षण शिबिरात ई-फायलिंग, ई-कोर्ट प्रणाली, ऑनलाईन न्यायप्रक्रिया तसेच न्यायालयीन कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. ज्युनिअर व सीनियर वकिल तसेच वकिलांचे लिपिक यांच्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरले.

या कार्यक्रमात मास्टर ट्रेनर म्हणून ॲड. किरण घाडगे व ॲड. किरण अंकुशराव यांनी ई-कोर्ट प्रणालीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोलापूर बार असोसिएशनचे सेक्रेटरी ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय खजिनदार ॲड. अरविंद देडे यांनी करून दिला.

प्रशिक्षकांचा सत्कार सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव व उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख यांच्या हस्ते करण्यात आला. या शिबिरात सुमारे 200 ते 250 वकील व त्यांचे क्लर्क मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी सदस्यांसाठी अल्पोपहार, जेवण तसेच स्टेशनरीची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच उपस्थितांना आकर्षक ऑफिस बॅगही देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयातील सहाय्यक अधीक्षक खमीतकर, लालसंगी तसेच आयटी व सिस्टीम विभागातील कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

या प्रशिक्षणामुळे सोलापूर न्यायालयीन परिसरातील वकील व त्यांच्या लिपिकांमध्ये ई-कोर्ट व डिजिटल न्यायप्रणालीबाबत जागरूकता, कौशल्य आणि आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली असून, डिजिटल न्यायक्रांतीकडे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

# रविराज चव्हाण ठरला अकलूज त्रिमूर्ती केसरीचा मानकरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धेत पंढरपूरच्या रविराज चव्हाणने करमाळ्याच्या जय पाटीलचा सहा तीन गुणाने पराभव करीत त्रिमूर्ती केसरी चषकाचा मानकरी ठरला. त्यास प्रथम क्रमांकाचे रोख रक्कम रुपये दोन लाख व सन्मानचिन्ह देण्यात आले. उपविजेता जय पाटील यास द्वितीय क्रमांकाचे रोख रुपये दीड लाख व सन्मानचिन्ह देण्यात आले. निमगाव के.येथिल सागर देवकाते यांनी तृतीय क्रमांकाचे रोख रुपये एक लाख व माळशिरसचा आर्यन पाटील यांनी चतुर्थ क्रमांकाचे पन्नास हजार रुपये व सन्मान चिन्ह पटकावले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्त जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ यांच्या वतीने शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात ४७ व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी कुस्ती स्पर्धा व वजन गटाच्या कुस्ती स्पर्धा पार पडल्या.जयंती समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व स्पर्धाप्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदर स्पर्धेचे आयोजन केले होते.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजीतसिंह मोहिते पाटील,खा. धैर्यशील मोहिते पाटील, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, स्पर्धाप्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील, आ. अभिजीत पाटील, माजी आ. लक्ष्मणराव ढोबळे, जयवंत जगताप, भगीरथ भालके, डॉ. अनिकेत देशमुख, वसंत देशमुख, भारत शिंदे, राष्ट्रीय पंच राम सारंग, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, व्हा.चेअरमन शंकरराव माने देशमुख, वसंत जाधव यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, मल्ल, कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंतिम अटीतटीच्या स्पर्धेत रविराज चव्हाण व जय पाटील यांनी पहिल्या वीस मिनिटात एकमेकाची ताकद आजमावली. यानंतर सहा मिनिटाची गुणावरती कुस्ती लावण्यात आली.

यामध्ये चपळाईने रविराज चव्हाण यांने ६ गुण मिळवीत विजय प्राप्त केला, तर जय पाटील याने 2 गुण मिळवले. युवराज केचे व सुकुमार माळी यांनी सूत्रसंचालन केले. स्वागत पोपट भोसले पाटील यांनी केले आभार बिभिषन जाधव यांनी मानले.

**विविध वजनी गटातील विजेते :-**

२५ किलो आदर्श चव्हाण (खुडूस) ,२८ कि. अर्णव भुसारे (दिघंची),३०कि. करण गायकवाड (खुडूस),३२ कि. करण नरके(खुडूस), ३५ कि.मेघराज तांबिले(अकलूज),४०कि. संस्कार जाधव(खुडूस),४५ कि सुधीर खवळे(माळशिरस),५० कि. यशराज मोरे (खुडूस),५५ कि. सौरभ नरुटे(खुडूस),६० कि. विशाल सुरवसे (खुडूस),६५ कि. अविराज माने (खुडूस),७० कि. रणजित गोरड (म्हसवड),७५ कि. सोमनाथ गोरड (म्हसवड),८० कि. राहुल कोरडे (मायणी),८५ कि. प्रकाश कोळेकर(सदाशिवनगर)

या स्पर्धेसाठी पंच म्हणून राष्ट्रकूल स्पर्धेचे विजेते, राष्ट्रीय कुस्तीचे पंच राम सारंग यांचेसह नितीन शिंदे, अनिल बाबर, चंद्रकांत मोहोळ, तानाजी केसरे, वैभव तेली, महेश पाटील, गोरख पाटील, महेश जाधव, माणिक पाटील, बाजीराव पाटील, प्रवीण निकम अकलूज येथील विराज निंबाळकर, भोजराज माने, बाजीराव सरगर, गणेश शिंदे, अशोक शिंदे, काका जगदाळे यांनी काम पहिले. या सर्वांचा स्पर्धा कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# सीना-माढा उपसासिंचनचे पाणी सोडण्यासाठी 90 लाखांचा निधी मंजूर- रणजितसिंह शिंदे



1) पालकमंत्री जयकुमार गोरे.
2)चेअरमन रणजितसिंह शिंदे.

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील तुळशी गावाच्या हद्दीतील सर्वात मोठ्या भवानी पाझर तलावात उजनी धरणातून कार्यान्वित असलेल्या सीना-माढा उपसासिंचन योजनेतून बंदिस्त पाईपलाइनद्वारे पाणी सोडण्यासाठी सन 2025-26 अंतर्गत सोलापूर जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्याने 90 लाखांचा निधी मंजूर झाला असून गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असल्याचे जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी दिली आहे.

या पाझर तलावात उपसासिंचन योजनेतून पाणी यावे यासाठी गावातील स्थानिक नेतेमंडळी व शेतकऱ्यांनी वेळोवेळी माजी आमदार बबनराव शिंदे व जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्याकडे मागणी केली होती.या मागणीचा गांर्भीयाने विचार करुन जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून हा भरीव निधी मंजूर केला आहे.या निधीतून सीना-माढा उपसासिंचन योजनेच्या अरण-बैरागवाडी या 7 नंबर वितरिकेतून सुमारे 700 ते 800 मीटर बंदिस्त पाईपलाईन करुन पुढे उताराला अनुसरून हे पाणी भवानी पाझर तलावात सोडण्यात येणार आहे.या भागातील सुमारे 60 ते 70 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. भूजलपातळी वाढून पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.लवकरच सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी सांगितले आहे.

सीना-माढा उपसासिंचन योजनेचे पाणी तुळशी येथील भवानी पाझर तलावात सोडून गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा यासाठी आम्ही जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.रणजितसिंह शिंदे यांनी पालकमंत्र्यांकडे यासंदर्भात पाठपुरावा केला होता.त्यास यश मिळाले असून आमची मागणी लवकरच पूर्णत्वास जाणार आहे.या पाझर तलावात पाणी आल्यानंतर गावातील भूजलपातळी,कूपनलिका व विहिरीतील पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे. गावातील बरेच क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.या पाण्याचा फायदा गावातील शेकडों ग्रामस्थ व नागरिकांनाही होणार आहे त्यामुळे चेअरमन रणजितसिंह शिंदे व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे ग्रामस्थ, शेतकऱ्यांसह अनेकांनी आभार मानले आहेत.

# बिनविरोधबाबतची याचिका ऐकण्यास न्यायालयाचा नकार



**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** राज्यात झालेल्या बिनविरोध निवडणुकांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत मनसे नेते अविनाश जाधव यांनी दाखल केलेली महत्त्वाची याचिका ऐकून घेण्यास उच्च न्यायालयाने दुर्दैवाने नकार दिला आहे. याच विषयावर काँग्रेसचे नेते समीर गांधी यांनी दाखल केलेली याचिकादेखील न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे बिनविरोध निवडणुकांबाबत सुरू असलेल्या वादाला सध्या तरी न्यायालयीन दिलासा मिळालेला नाही.

या याचिकांमध्ये मांडलेली मागणी अत्यंत साधी आणि लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची होती. राज्यात 68 ठिकाणी बिनविरोध निवडणुका झाल्या असून, त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून चौकशी सुरू आहे. मात्र ही चौकशी उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली, ठरावीक कालमर्यादेत पार पडावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांकडून करण्यात आली होती.

मात्र न्यायालयाने या प्रकरणात कोणतीही घटनात्मक किंवा कायदेशीर दखल न घेता याचिका ऐकून घेण्यास नकार दिला आणि त्या फेटाळून लावल्या. न्यायालयाच्या या निर्णयामुळे लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

यांप्रकरणी याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे अनुभवी व ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. असिम सरोदे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'आज कोर्टात आम्ही बिनविरोध निवडणुकांबाबत विरोधाची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. किमान या निर्णयांची न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी व्हावी, ही आमची भूमिका होती. दुर्दैवाने याचिकांवर कोणतीही घटनात्मक व कायदेशीर चर्चा न करता त्या ऐकून घेण्यास नकार देण्यात आला.' सरकार, निवडणूक आयोग आणि सत्ताधारी यंत्रणांवर दबाव, दडपशाही किंवा अपारदर्शकतेमुळे बिनविरोध निवडणुका होत असल्याचे आरोप यापूर्वी अनेकदा झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर या याचिकांकडे लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वाचा हस्तक्षेप म्हणून पाहिले जात होते. उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता बिनविरोध निवडणुकांच्या चौकशीचा विषय पूर्णपणे राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर अवलंबून राहणार असून, या निर्णयावर राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

# सोलापूर पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यांवर धाड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शहरात अवैध मद्य निर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे शाखेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने गेल्या काही दिवसांत चार वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून लाखो रुपयांची दारू आणि वाहने जप्त केली आहेत.

हातभट्टीवर धाडः १२८५ लिटर रसायन नष्ट : पहिली कारवाई ९ जानेवारी २०२६ रोजी सलगरवस्ती पोलीस स्टेशनच्या हद्दीत 'कवठे' येथे करण्यात आली एका शेतात गुळमिश्रित रसायन वापरून हातभट्टीची दारू गाळली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या कारवाईत पोलिसांनी १२८५ लिटर गुळमिश्रित रसायन आणि ८० लिटर तयार दारू असा एकूण ५२,९७५ रुपयांचा मुद्देमाल जागीच नष्ट केला. यांप्रकरणी संजय गोपीचंद राठोड, कुमार उर्फ बाबू पांडुरंग चव्हाण आणि प्रियांका कुमार चव्हाण यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विदेशी दारूच्या बाटल्यांसह दुचाकी जप्त : दुसरी कारवाई १२ जानेवारी रोजी हॉटेल ॲम्बेसेडर ते प्रभाकर महाराज मंदिर रोडवर करण्यात आली. अमोल बाळासाहेब भोसले हा इसम दुचाकीवरून देशी-विदेशी दारूच्या बाटल्या विक्रीसाठी घेऊन जात असताना पकडण्यात आले. त्याच्याकडून १,०३,६६० रुपये किमतीची दारू आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली असून, फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

रिक्षातून होणारी दारू वाहतूक रोखली : तिसऱ्या कारवाईत गांधीनगर, अक्कलकोट रोड परिसरातून रिक्षाद्वारे होणारी दारूची वाहतूक पकडण्यात आली. नरेंद्र रामलू कोंडा याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून १,३२,५०० रुपये किमतीच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या आणि रिक्षा जप्त करण्यात आली. एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणाची नोंद करण्यात आली आहे.

अशोक चौकातील वाईन शॉप मालकावर गुन्हा : चौथी कारवाई कर्णिक नगर येथील स्वातंत्र्य सैनिक रिक्षा स्टॉपजवळ करण्यात आली. संदीप विष्णू शिंदे याला विदेशी दारूच्या बाटल्यांसह पकडण्यात आले.

तपासात ही दारू अशोक चौकातील गोल्ड वाईन शॉपच्या मालकाशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी १,१२,८८० रुपये किमतीचा माल आणि दुचाकी जप्त केली असून, जेलरोड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

यांच्या मार्गदर्शनाखाली झाली कारवाईः ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील, सहायक पोलीस आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, सपोनि शंकर धायगुडे, शैलेश खेडकर, पोसई मुकेश गायकवाड आणि त्यांच्या पथकाने केली आहे.

# मराठा सेवा संघाच्या कार्यालयात जिजाऊ जयंती साजरी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** 12 जानेवारी राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या ४२८ व्या जयंतीनिमित्त आज मराठा सेवा संघाच्या जिल्हा कार्यालयामध्ये जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीला जिजाऊ वंदना म्हणण्यात आली. त्यानंतर अभिवादन करून सर्वांना शुभेच्छा दिला.

यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवश्री सदाशिव पवार जिल्हा सचिव लक्ष्मण महाडिक सर संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष प्रकाश ननवरे वधुवर कक्षाचे राम माने, राजू व्यवहारे, शिवधर्म परिषदेचे शिवाचार्य गोवर्धन गुंड, जिजाऊ ब्रिगेडच्या उज्वलाताई साळुंखे, अभींजली जाधव, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्ष प्रीती कदम, लता ढेरे या उपस्थित होत्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन चव्हाण, नितीन मोहिते, राजू व्यवहारे, प्रकाश डोंगरे, अंबादास सपकाळे नरेश मोहिते, राजेंद्र भोसले, इत्यादीने परिश्रम घेतले.

# पोस्को प्रकरणी नवऱ्याला उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन- ॲड. जयदीप माने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** या प्रकरणाची हकीकत अशी की, सदर अल्पवयीन मुलीचे लग्न तिच्या आई-वडिलांनी आरोपी बरोबर लावून दिलेले होते. सदर लग्नानंतर ती सासरी नांदत होती. काही महिन्यानंतर तिला बरे वाटत नसल्याने सोलापुरातील एका नामांकित रुग्णालयात दाखल केले होते. तेथे दाखल होताना केस पेपर वर तिच्या आधार कार्डावरून तिची जन्मतारीख नोंदवण्यात आली होती. डॉक्टरांनी तिला तिच्या आजारपणाबद्दल तपासले त्यावेळी ती गरोदर असल्याचे त्यांच्या लक्षात आले. सदर मुलगी जरी विवाहित असली तरी तो पोस्को अंतर्गत गुन्हा होत असल्याने डॉक्टरांनी पोलिसांना कळवले. पोलिसांनी तिचा जबाब घेतला आणि त्या जबाबाच्या आधारे नवऱ्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. नवऱ्याने दाखल केलेला अटकपूर्व जामीन सेशन्स कोर्टाने फेटाळून लावला होता.

त्यानंतर नवऱ्याने ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर अटकपूर्व जामीन अर्जाच्या सुनावणी दरम्यान ॲड. जयदीप माने यांनी असा युक्तिवाद केला की, लग्न ठरविले त्यावेळी पत्नी अल्पवयीन आहे याची कल्पना आरोपीला देण्यात आली नव्हती, आरोपी निष्पाप आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून न्यायमूर्तींनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. राणे तर पत्नी तर्फे ॲड. श्रुती जाधव यांनी काम पाहिले.

सदर प्रकरणी पोलिसांनी पत्नीचे आई-वडील, सासू सासरे यांच्या विरुद्ध देखील न्यायालयात दोषारोपपत्रक पाठवले आहे.

# फातिमाबी शेख यांचे नावे विद्यापीठ असावे- अनिसा सिकंदर



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा अहिल्यानगर आयोजित, चौथे युगस्त्री फातेमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन कवयित्री मेहमूदा रसूल शेख यांच्या अध्यक्षतेखाली श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथे थाटात संपन्न झाले.

यावेळी बोलताना संमेलनाचे उद्घाटक डॉक्टर श्रीपाल सबनीस म्हणाले की सावित्रीबाईच्या पत्रामध्ये असणारा फातिमाबी शेख यांचा उल्लेख त्यांचं अस्तित्व असणारा महत्त्वाचा पुरावा असल्याचा उल्लेख करून फातिमाबी शेख यांचे काळजातले स्थान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. आज त्यांच्या नावाने साहित्यिक सोहळे साजरे होत आहेत.मुस्लिम मराठी स्त्री साहित्यिक मोठ्या प्रमाणात लिहीत आहेत.हा मराठी सांस्कृतिक संचिताचा गौरव आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक खाजाभाई बागवान व संस्थापक शफी बोल्डेकर यांनी केले . याच कार्यक्रमात स्पंदन स्मरणिका,' युगस्त्री फातिमाबी शेख ' प्रातिनिधीक काव्यसंग्रह संपादन अनिसा सिकंदर शेख, तसेच त्यांचाच काव्यसप्तक हा काव्यसंग्रह, काळ काळांत, व अहमदनगर साहित्यिक सूची शब्बीर बिलाल, 'शेवटी सोबत काहीच येत नाही' नसीम जमादार,खाजाभाई बागवान लिखीत "सांस्कृतिक सावल्या समिक्षा ग्रंथ या ग्रंथाचे प्रकाशन डॉक्टर श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

फातिमाबी शेख साहित्यरत्न पुरस्कार सायराबानो चौगुले यांना तर ॲड. सिकंदर लतीफ शेख यांच्या स्मरणार्थ समाजभूषण पुरस्कार शहाजान शेख व मुख्याध्यापक हुसेनसाब बागवान यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार निलोफर फणिबंद यांना प्रदान करण्यात आला.

जयंती निमित्त फातीमाबी शेखवर स्पर्धा घेण्यात आल्या ते बक्षीस पात्र यशवंत हिराबाई पगारे, कृष्णा अविनाश क्षीरसागर, ज्योत्स्ना डासाळकर, दादासाहेब शेख यांचा सन्मान करण्यात आला तसेच 'इख्लास रमजान' अंकातील उत्कृष्ट कविता बा.ह मगदूम, सुमैय्या चौधरी,आलिया गोहर यांना सन्मानित करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून संस्थापक शफी बोल्डेकर, संस्थाध्यक्ष हाशम पटेल, संस्था सचिव डॉक्टर सय्यद जब्बार पटेल, प्राचार्य इ.जा. तांबोळी, गझलकार बा. ह. मगदूम, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन आदि मान्यवर साहित्यिक उपस्थित होते. वर्तमान चिंतन मांडताना हिंदू मुस्लिम भाईचारा कुठे हरवला या विषयीचे चिंतन करताना आमची हिंदू मुस्लिम संत साहित्य परंपरा जपण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संमेलनाध्यक्षा मेहमूदा शेख यांनी केले.

यावेळी प्रा. डॉ. राहुल हांडे यांनी फातिमाबी शेख यांच्या विषयी आपले विचार मांडून त्यांचे अस्तित्व सिद्ध केले. फातिमाबीची जयंती शाळा कॉलेजात, सरकारी निमसरकारी दप्तरात साजरी व्हावी, फातिमा शेख च्या नावे विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे फातिमाबी शेख प्रातिनिधिक काव्य संग्रहाच्या संपादिका अनिसा सिकंदर आपल्या मनोगतात म्हणाल्या.

दुपार सत्रात कवी संमेलनाध्यक्ष नुरजहाँ शेख यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन यशस्वी संपन्न झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था सर्व पदाधिकारी अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष दिलशाद सय्यद, स्वागताध्यक्ष डॉक्टर सलीम सिकंदर शेख, रज्जाक शेख, केंद्रिय सहसचिव अनिसा सिकंदर शेख, केंद्रिय उपाध्यक्ष खाजाभाई बागवान, शबाना तांबोळी,बेन्जीर शेख यांनी विशेष प्रयत्न केले.


## पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य www.katusatya.in
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

**फोन : 0217-2605091 मो.9657069069**

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फॉन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.